# मुके अश्रू

"आई, तुम्ही आमची अजिबात काळजी करू नका. मी घराकडे बरोबर लक्ष देईन. हवं तर कामवाल्या मावशींना जास्त वेळ थांबायला सांगेन. तुम्ही तिकडे एंजॉय करा. तुमच्या वयाच्या अनेक बायका तिथे भेटतील तुम्हाला. मस्तपैकी धमाल करा." स्वरा सासुबाईंची बॅग भरत म्हणाली.

"पण स्वरा, आई कशी राहील गं एकटी. तिला आपल्या कुटुंबासोबत राहायची सवय आहे." धीरजने विचारले.

"धीरज, आता तू मध्ये मोडता घालू नकोस. अशा पण त्या घरात बोर होतात. आपण दोघं दिवसभर ऑफिसला, मुलं शाळेत आणि त्यानंतर ट्यूशनला. बाबा गेल्यानंतर घर त्यांना खायला उठतंय. सतत बाबांच्या आठवणीत राहतात. आणि अशापण आई स्वतः जायला तयार आहेत आनंदाने. हो की नाही हो आई!" स्वरा सासूबाईकडे बघत म्हणाली.

अलकाताई काहीच बोलल्या नाहीत. गप्पपणे जे चाललंय ते बघत बसल्या. सर्व आवरून झाल्यावर अलका ताईंनी छोट्या सोनूमोनूचा पापा घेतला आणि म्हणाल्या, "आई-बाबांना त्रास नका देऊ रे."

"आई महिन्यातून एकदा आम्ही तुम्हांला भेटायला येत जाऊ. एंजॉय करा." स्वरा म्हणाली.

"चल आई!" अलकाबाईंची बॅग कारमध्ये ठेवत धीरज म्हणाला.

अलकाताई गप्पपणे कारमध्ये जाऊन बसल्या. आनंदाश्रमात जाईपर्यंत धीरज एकटाच बडबड करत होता. अलकाताई फक्त हो नाही एवढेच बोलत होत्या.

कार निघून गेल्यावर स्वराने आईला फोन लावला. "होय मम्मी, आताच गेली म्हातारी. किती कष्टाने मी धीरजला पटवून दिलं की म्हातारीला इथे करमत नाही. नशीब म्हातारी काहीच बोलली नाही. नाहीतर धीरजने म्हातारीला जाऊन दिलं नसतं. चल मी आता फोन ठेवते. मी आज खूप खुश आहे माझ्या मागची कटकट गेली."

आनंदाश्रमात पोचल्यावर धीरज आणि अलकाताई ऑफिसमध्ये गेले. तिथल्या अधिकाऱ्यांसोबत बोलून धीरज परत निघाला. जाता जाता आईच्या पाया पडला. धीरज खाली वाकल्यावर त्याच्या हातावर एक अश्रूचा थेंब पडला. धीरजने लगेच वर अलका ताईंच्या डोळ्यांत बघितले. त्यांचे डोळे अश्रूंनी भरले होते. अश्रू बाहेर पडू नये म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केला पण शेवटी मनातले दुःख अश्रूरुपात बाहेर पडलेच. आईच्या डोळयांतील अश्रू बघून धीरज काय समजायचं ते समजून गेला आणि त्याने एक निर्णय घेतला.

"चल आई, तू नाही रहायचं इथे." धीरज म्हणाला.

"पण बाळा!" अलकाताई म्हणाल्या.

"होय आई, तू नाही रहायचं इथे. तू आम्हां सर्वांसोबत आपल्या घरी रहायचं" धीरज म्हणाला.

"देवा असे प्रत्येक आईवडिलांच्या डोळ्यांतील मुके अश्रू मुलांना दिसले तर वृद्धाश्रम जवळजवळ संपुष्टात येतील." अलकाताई मनातच म्हणाल्या.

सौ. माधवी पंकज हांडे,
ठाकुर्ली, ठाणे.

## चि. अन्वी पंकज हांडे, ई. १ ली, ठाकुर्ली, ठाणे हिने काढलेले चित्र

